SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 Stat Cell : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
फॅक्स : ००९१-२३१-२६९३२९४ E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/२०१९-२०/ 459 दिनांक : 21/11/2019

# स्मरणपत्र क्रमांक १

**प्रति,**
**प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था,**
(Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांसाठी )

**विषय : माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS)**
वेबपोर्टलवर सन २०१९-२० या वर्षाची माहिती नोंदणेबाबत....

**संदर्भ : १. सांख्यिकी कक्षाने पाठविलेल्या दिनांक ०६/११/२०१९ रोजीचा ई-मेल.**
**२. जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/२०१९-२०/४३७, दिनांक १५/१०/२०१९ रोजीचे परिपत्रक व ई-मेल.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकित पत्रास व ई-मेल अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षण संचालनालयाकडून सन २०१९-२० हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित तसेच Directorate of Higher Education ची अभ्यासक्रमांना मान्यता असणा-या महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०१९-२० करिता दिनांक ३० सप्टेंबर हया संदर्भ दिवसा पर्यंतची माहिती एमआयएस वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे.

सदरची माहिती दिनांक ३०/११/२०१९ पर्यंत माहिती नोंदणीचे काम संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निश्चितपणे पूर्ण करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ अन्वये आपल्याला कळविण्यात आलेले होते. तथापी उच्च शिक्षण संचालनालय पुणे यांच्या कार्यालयाकडुन सदरची माहिती **दिनांक १५/११/२०१९** पुर्वी नोंद करावी असे कळविण्यात आले आहे. सदर माहितीचा आढावा घेतला असता बहुतांशी महाविद्यालयाची माहिती वेबपोर्टलवर नोंद केलेली दिसुन येत नाही. महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सदर बाब आपल्या महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडुन त्वरीत कार्यवाही करून घ्यावी. वेबपोर्टलवर माहिती **दिनांक २३/११/२०१९** पुर्वी नोंद करून विद्यापीठास सहकार्य करावे, हि विनंती. माहिती वेळेत नोंद न केल्याबद्दल शासन आदेशानुसार होणा-या दंडात्मक कार्यवाहीस आपले महाविद्यालय जबाबदार असेल याची कृपया आपण नोंद घ्यावी. ज्या महाविद्यालयांनी माहिती नोंद केलेली आहे अशा महाविद्यालयांना सदरचे स्मरणपत्र लागु असणार नाही. महाविद्यालयांनी माहिती नोंद केली असल्यास व प्रमाणपत्र पाठविले नसल्यास सदरच्या महाविद्यालयांनी प्रमाणपत्र तात्काळ विद्यापीठास पाठवावे .

**एमआयएस वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष, (खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव